# भारताच्या विकासाचा वेध घेणारी अभिनव दहिहंडी



अण्णासाहेब आवटे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'भारताच्या विकासाचा वेध घेणारी अभिनव दहिहंडी' साजरी केली. (छाया - विवेकांनद काटमोरे)

मांजरी, दि. २४ (प्रतिनिधी)- हडपसर (महादेवनगर) येथील अण्णासाहेब आवटे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गेल्या पन्नास वर्षात भारताने साधलेल्या 'आर्थिक विकासाचा वेध घेणारी एक अभिनव दहिहंडी' साजरी केली.

अभियांत्रिकीच्या तिन्ही वर्षांसाठी शिक्षण घेत असलेल्या प्रमुख विद्यार्थ्यांनी करियर मार्गदर्शक प्रा. विजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली १९५० ते २००८ या कालावधीत आपल्या भारत देशाने विविध क्षेत्रात प्रगती करीत जो विकास साधला आहे. त्याचे टप्पे तयार करून या हंडीच्या मनोऱ्याची रचना केली होती. त्यामध्ये ऑटो मोबाइल क्षेत्राची वाढ, आयर्न इंडस्ट्रीज, पायाभूत सुविधा, हरितक्रांती, क्षेपणास्त्र, अण्वस्त्र विकास, गॅट, जागतिक बाजार पेठेतील स्थान आदींची माहिती असलेले कागदी बॉक्स मनोऱ्यासाठी वापरण्यात आले होते. अभियांत्रिकीचे या सर्वात असलेले योगदानही त्यात मांडण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी उभारलेली ही अभिनव दहिहंडी पाहण्यासाठी इतर महाविद्यालयातील विद्यार्थीही आले होते. विद्यार्थ्यांच्या या 'अभिनव दहिहंडी' उपक्रमाबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. आर हर्णे यांनी त्यांचे कौतुक केले.